# जाहिरात

१. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एबावि-२०२२/ प्र.क्र.९४/का.६ दिनांक०२ फेब्रुवारी २०२३
२. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एबावि-२०२२/ प्र.क्र.९४/का.६ दिनांक ११ ऑगस्ट २०२३
३. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२२/ प्र.क्र.९४/का.६ दिनांक२७ फेब्रुवारी २०२४
४. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांकःएबावि-२०२२/ प्र.क्र.९४/का.६ दिनांक ३० जानेवारी२०२५

नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी सोलापूर शहर पश्चिम या प्रकल्पांतर्गत रिक्त असलेली अंगणवाडी मदतनीस ही मानधनी पदे सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी पात्र महिला उमेदवारांकडून अर्ज मागणी करण्यात येत आहे. प्रकल्पात अंगणवाडी मदतनीस रिक्त पद संख्या २२ एवढी आहे.

**अंगणवाडी मदतनीस** या मानधनी पदाच्या सरळ नियुक्ती (By Nomination) संदर्भात आवश्यक असणाऱ्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशील | अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | पदाचे नाव | **अंगणवाडी मदतनीस (मानधनी सेवा)** |
| २ | मानधन | अंगणवाडी मदतनीस एकत्रित दर महा मानधन रुपये ७५००/- राहील. |
| ३ | शैक्षणिक पात्रता | अंगणवाडी मदतनीस पदासाठी महिला उमेदवाराची किमान **शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी उत्तीर्ण** (राज्य शिक्षण मंडळाची अथवा त्यास समकक्ष) आवश्यक राहील. शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेच्या आवश्यक कागदपत्रांच्या व गुणपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित केलेल्या सोबत जोडाव्यात. |
| ४ | वास्तव्याची अट | सोलापूर महानगरपालिका शहर हद्दी पैकी बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी सोलापूर शहर पश्चिम या प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी असलेल्या उमेदवारास स्थानिक समजण्यात येईल. सोलापूर महानगरपालिका शहर हद्दीतील प्रभाग क्र. ७,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१,२५,२६ मधील क्षेत्र हे बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी सोलापूर शहर पश्चिम या प्रकल्पाचे कार्यक्षेत्र आहे. वर नमुद करण्यात आलेल्या प्रभागातील रहिवासी उमेदवारांनी अर्ज दाखल करावेत. वरील प्रभागा बाहेरील रहिवासी अपात्र असतील. स्थानिक रहिवासी असलेबाबत शासनाने निश्चित केलेला पुरावा सोबत जोडणे आवश्यक आहे (आधारकार्ड किंवा रेशनकार्ड किंवा तहसिलदार यांचे डोमासाईल सर्टीफिकेट किंवा रहिवासी प्रमाणपत्र (तलाठी)) तसेच उमेदवारांनी वरील प्रभागातील रहिवासी असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सोबत जोडण्यात यावे. |
| ५ | वयाची अट | जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे आणि विधवा उमेदवारासाठी वयोमर्यादा कमाल ४० वर्षे राहिल. (जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा १० वी प्रमाणपत्र जोडावे) |
| ६ | लहान कुटुंब | १.उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये असावेत.<br>२.उमेदवारास दोन हयात अपत्यापेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यासह) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. सदर बाब नियुक्ती नंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतुन तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल. तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यासह) असुन देखील तिसरे अपत्य झाल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.<br>३.अर्जासोबत परिशिष्ट ब मधील नमुन्यात लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहील. |
| ७ | भाषेचे ज्ञान | ज्या अंगणवाडी केद्रा करिता अंगणवाडी मदतनीस नियुक्ती करावयाची आहे.अशा अंगणवाडी मध्ये ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उर्दु, हिंदी, इत्यादी पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर तेथील अंगणवाडीमध्ये मदतनीस पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्या (लिहिता व वाचता येणे) उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल. तथापी अशा उमेदवाराने इयत्ता १० वी किंवा १० वी पेक्षा जास्त शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा सह उत्तीर्ण असने आवश्यक राहिल. |

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना) सोलापूर शहर-पश्चिम

| | | |
|---|---|---|
| ८ | विधवा अनाथ उमेदवारा बाबत | १.उमेदवार विधवा असल्यास विधवा असले बाबतचे स्वयंघोषणापत्र व सोबत पतीचे मृत्यु प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.<br>२. उमेदवार अनाथ उमेदवार असल्यास सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी. |
| ९ | बदली | अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे तसेच स्थानिक रहिवासी असावी या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचाऱ्यांना बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही. तसेच प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. |
| १० | प्रवर्ग | अनुसूचित जाती/ जमाती/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ आर्थीक दृष्टया दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी. |
| ११ | अनुभव | शासकीय यंत्रणेतील एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडी सेविका/ मिनी अंगणवाडी सेविका/ अंगणवाडी मदतनीस म्हणून कमीत कमी दोन वर्ष अनुभव असल्यास सक्षम प्राधिकारी यांच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी. |
| १२ | जाहिरात प्रसिध्दी दिनांक | दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ |
| १३ | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | अर्ज स्विकारण्याचा अंतिम वेळ व दिनांक- दिनांक १०/०३/२०२५ रोजी सायंकाळी ०६:१५ वाजेपर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील.<br>**बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय (नागरी) सोलापूर शहर पश्चिम, डॉ.आंबेडकर हौसींग सोसायटी, प्लॉट नं.२, गडहिरे बिल्डींग, दुसरा मजला, उजनी कॉलनी, आर्किटेक्चर कॉलेज मागे, अंत्रोळीकर नगर जवळ, सिव्हील लाईन सोलापूर ४१३००३या पत्यावर अर्ज सादर करण्यात यावेत.** |
| १४ | प्राथमिक यादी | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकापासून १५ दिवसात कार्यालयातील नोटीस बोर्ड वर प्रसिध्द करण्यात येईल. |
| १५ | यादीस हरकती | यादीतील कोणत्याही उमेदवाराचे प्रमाणपत्र व त्या बाबतचे दिलेले गुण या बाबत तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी प्राथमिक यादी कार्यालयातील नोटीस बोर्डवर प्रसिध्द झाल्यापासून पुढील १० दिवसांच्या आत बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी सोलापूर शहर पश्चिम यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार करता येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही. |
| १६ | प्रतिक्षा यादी | जर उमेदवार हा नियुक्ती आदेशातील नमुद दिनांका पासून पुढील ३० दिवसांमध्ये रूजू झाला नाही किंवा एखादा उमेदवार अपात्र ठरविण्यात आला तर प्रतिक्षा यादीतील गुणानूक्रमांकानुसार नियुक्ती देण्यात येईल व सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहिर झाल्या पासून एक वर्षापर्यंत वैध राहिल. |
| १७ | निवड प्रक्रिय विरूध तक्रार/अपील | निवड संदर्भात कोणत्याही उमेदवाराची त्यांच्यावर अन्याय झाल्याची तक्रार असल्यास निवड यादी घोषित झाल्यापासून पुढील ३० दिवसांच्या आत मा.विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील दाखल करता येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही. |
| १८ | कागदपत्राच्या प्रती | अर्जा सोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रति सक्षम प्राधिकारी यांनी साक्षांकित केलेल्या असाव्यात. (साक्षांकन राजपत्रीत अधिकारी, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक किंवा प्राचार्य किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचे असावे.) |
| १९ | अर्ज | १. जाहिराती मध्ये दिलेल्या विहीत नमुण्यात अर्ज करावा. (अर्जात खाडाखोड/ गिरवा गिरव करु नये, तसेच व्हाईटनरचा वापर करु नये असे अर्ज अपात्र करण्यात येतील.) अर्ज सादर करतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडावे. अर्ज सादर केल्यानंतर कोणतेही कागदपत्र/ प्रमाणपत्र घेतले जाणार नाहीत.<br>२. उमेदवाराने विवाह पूर्वीचे नाव व विवाह नंतरचे नाव या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असल्याबाबत राजपत्र किंवा रु.१०० चे स्टँप पेपर वरील प्रतिज्ञापत्र या पैकी एक अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. |

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना) सोलापूर शहर-पश्चिम

| | | |
|---|---|---|
| | | ३. अर्जदाराने नियुक्ती करीता कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.<br>४. अंतिम दिनांकानंतर आलेल्या किंवा डाकेव्दारे (पोस्टाव्दारे) विलंबाने पोहोचलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.<br>५. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना निवड झालेबाबत कळविण्यात येईल. इतर उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.<br>६. अंगणवाडी मदतनीस यांना शासन नियमानुसार दरमहा मानधन देय आहे. शासकिय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवेळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहील. मात्र मानधना व्यतिरीक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत.<br>७. अंगणवाडी मदतनीस हे पद मानधनी स्वरुपाचे असल्याने सदर पदास बदली, सेवानिवृत्ती वेतन, वेतन वाढ इत्यादी शासकिय सवलती अनुज्ञेय नाहीत. |
| २० | निवड प्रक्रिया | शासन निर्णयात नमुद केल्या प्रमाणे उमेदवाराच्या शैक्षणिक गुण पत्रिकेमध्ये मिळालेल्या गुणाच्या आधारे ८० गुण (१२ वी, पदवीधर, पदव्युत्तर, डीएड, बीएड व शासकिय मान्यता संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रताणपत्र (MS-CIT) अथवा शासनाने वेळोवेळी समकक्ष ठरविलेला संगणक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र यांचे एकत्रित कमाल ८० गुण) व अतिरिक्त २० गुण (विधवा/अनाथ - १० गुण, अनुसुचित जाती/जमाती - ०५ गुण, इतर मागास प्रवर्ग /विमुक्त जाती /भटक्या जमाती /आर्थिक दुष्टया दूर्बल /विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग - ०३ गुण, अंगणवाडी सेविका /मदतनिस/ मिनी अंगणवाडी सेविका या पदाचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असल्यास - ०५ गुण ) |
| २१ | पत्र व्यवहार | भरती प्रक्रिये संबंधी अर्जदारास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही. सर्व सूचना जाहिराती मधील अटी व शर्ती प्रमाणे असून वेळोवेळी सूचना कार्यालयातील नोटीस बोर्डवर लावण्यात येतील. |
| २२ | सेवासमाप्ती साठी वयाची अट | सदर आदेशान्वये नियुक्त होणाऱ्या अंगणवाडी मदतनिस यांची सेवा वयाची ६० वर्षे पुर्ण होईपर्यत किंवा त्या शारीरिक दृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास यापेकी जे आधी घडेल तो पर्यत सुरु राहिल. |
| २३ | भरती प्रक्रिया | सदर भरती प्रक्रियेत नमुद पद संख्येत बदल करण्याचा अथवा संपूर्ण भरती प्रक्रिया कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचा पूर्ण अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी सोलापूर शहर पश्चिम यांना राहील. अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रिया खालील शासन निर्णयाच्या अधिन राहून घेतली जाईल.<br>१. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एबावि-२०२२/ प्र.क्र.९४/ का.६ दिनांक ०२ फेब्रुवारी २०२३<br>२. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एबावि-२०२२/ प्र.क्र.९४/ का.६ दिनांक ११ ऑगस्ट २०२३<br>३. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एबावि-२०२२/ प्र.क्र.९४/ का.६ दिनांक २७ फेब्रुवारी २०२४<br>४. महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एबावि-२०२२/ प्र.क्र.९४/ का.६ दिनांक ३० जानेवारी २०२५ |

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना.) सोलापूर शहर-पश्चिम

Dhepe

(दीपक ढेपे)

**बाल विकास प्रकल्प अधिकारी (ना.)**

**सोलापूर शहर पश्चिम**

# अर्जाचा नमुना

| |
|---|
| अर्जदाराचा फोटो या चौकानात चिटकवावा |

| |
|---|
| अर्जदारांची स्वाक्षरी |

**प्रति,**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी,**
**(नागरी ) सोलापूर शहर पश्चिम**

**विषय :- अंगणवाडी मदतनीस पदाकरिता अर्ज सादर करणेबाबत..**

महोदय,

मी खाली सही करणार सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक ------ मधील रहिवासी असून अंगणवाडी मदतनीस या पदासाठी अर्ज करु इच्छित आहे. त्याकरिता मी माझी संपूर्ण माहिती खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१) विवाह पुर्वीचे संपूर्ण नाव :- ------------------------------------------------------------------------------

२) विवाह नंतरचे संपूर्ण नाव :- ------------------------------------------------------------------------------

३) जन्मतारीख अंकी दिनांक :- -----/-----/-----------

अक्षरी दिनांक :- ------------------------------------------------------------------------------

४) जाहिरातीच्या दिनांकास वय :- -------वर्षे ------ महीने ------ दिवस

५) रहिवासी संपूर्ण पत्ता :- ------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

६) प्रभाग क्रमांक :- -------------

७) उमेदवार स्थानिक रहिवासी आहे / नाही :- ---------------------------------------------------------------

८) उमेदवार विवाहीत / अविवाहीत :- ------------------------------------------------------------------------

९) हयात अपत्यांची संख्या :- ----------------- शेवटच्या अपत्यांचा जन्म दिनांक:- ----------------------------

१०) जात :- --------------------------------------- प्रवर्ग :- ---------------------------------------------

११ ) उमेदवार विधवा / अनाथ मुलीपैकी आहे / नाही :- ------------------------------------------------------

१२) शैक्षणिक पात्रता:-

| अ.क्र. | शिक्षण | वर्ष | बोर्डाचे / विद्यापिठाचे नांव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता बारावी | | | | |
| २ | पदवी | | | | |
| ३ | पदव्युत्तर | | | | |
| ४ | डी.एड. | | | | |
| ५ | बी.एड. | | | | |
| ६ | शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) | | | | |

१३) इयत्ता १० वी किंवा १० वी पेक्षा जास्त शैक्षणिक अर्हता पैकी किमान एक अर्हता

मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण आहे किंवा नाही :- -----------------------------------------------------------

१४) शासकीय अंगणवाडीतील सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस कमीत

कमी दोन वर्षे अनुभव आहे काय? :- --------------------------------------------------------------------

१५) उमेदवारास दोन किंवा दोनपेक्षा कमी अपत्य असल्याचे प्रतिज्ञापत्र जोडले आहे/नाही ---------------------------

१६) उमेदवाराचा दुरध्वनी क्रमांक / मोबाईल नंबर:- --------------------------------------------------------------

वरील संपूर्ण माहिती खरी असून ती चूकीची आढळल्यास माझा अर्ज फेटाळला जाईल किंवा माझी निवड झाल्यानंतरही माझी नियुक्ती कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती अधिकाऱ्यांना आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. तसेच जर माझी अंगणवाडी मदननिस म्हणुन निवड झाल्यास बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) सोलापूर शहर पश्चिम या प्रकल्प कार्यक्षेत्रातील देण्यात येणाऱ्या कोणत्याही अंगणवाडीवर काम करण्यास मी तयार आहे. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

(उमेदवाराची सही)

संपूर्ण नाव --------------------------------

दिनांक- / /

# परिशिष्ट ब - लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र

मी श्रीमती ------------------------------------------------------------------------------------------

श्री ------------------------------------------------------------------ यांची पत्नी, वय ------------ वर्ष,

राहणार ----------------------------------------------------------------------------------------------

याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

१) मी ----------------------------------------------पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला खालील प्रमाणे अपत्ये आहेत. (उमेदवाराने जेवढे हयात अपत्य असतील त्यांची सर्व नावे लिहावी.)

| अ.क्र. | मुलाचे/मुलीचे नाव | जन्म तारीख | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

३) हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल, किंवा भविष्यात दोनपेक्षा अधिक मूले झाल्यास, अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास किंवा सेवेतून कमी करण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

४) मला दोन पेक्षा जास्त अपत्य होणार नाहीत यासाठी मी कुटुंबनियोजन करुन घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाण:

दिनांक : (नाव व सही)

# रहिवासी स्वयंघोषणापत्र

मी श्रीमती ---------------------------------------------------------------------------------

(संपूर्ण नाव) असे घोषित करते कि, मी --------------------------------------------------------------------

---------------------------------------------------- (संपूर्ण पत्ता) या शहरातील प्रभाग क्रमांक ---------------

स्थानिक तसेच कायमची रहिवासी आहे.

उमेदवाराची सही -

उमेदवाराचे नाव -

# विधवा असल्याबाबत स्वयंघोषणापत्र

मी --------------------------------------------------------वय ------वर्षे, आधार कार्ड क्रमांक (असल्यास) ---------------------------------------------व्यवसाय ------------------------------------- राहणार ---------------------------------------------------------------------------------------------------- असा आहे.याव्दारे घोषित करते की, माझे पती कै. ------------------------------------------------------------ हे मयत झालेले असून मी विधवा आहे. तसेच मी पुनर्विवाह केलेला नाही.

तसेच मी याव्दारे घोषित करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्रकाव्दारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वंकषरित्या काढून घेण्यात येतील याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी

## अर्जा सोबत जोडावयाचे साक्षांकित केलेली कागदपत्रे

१. उमेवाराने विवाहपुर्वीचे नाव व विवाहानंतरचे नाव या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असल्याबाबत राजपत्र किंवा १०० रुपयाचे स्टँप पेपर वरील प्रतिज्ञापत्र या पैकी एक

२. जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा १० वी प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत

३. उमेदवार अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती / इतर मागास प्रवर्ग/विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणीक दृष्टया मागास वर्ग मधील असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

४. आधार कार्ड, रेशन कार्ड, तहसीलदार यांचे डोमासाईल प्रमाणपत्र / रहिवासी प्रमाणपत्र (तलाठी)

५. उमेदवार सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक ७,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९, २०,२१,२५,२६ या प्रभागातील असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र

६. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

७. उमेदवार विधवा असल्यास स्वयंघोषणापत्र व पतीच्या मृत्युचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र, अनाथ असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणत्र

८. इयत्ता १० वी उत्तीर्ण, १२ वी उत्तीर्ण, पदवीधर, पदव्युत्तर, डी.एड., बी. एड., MS-CIT/संगणक समकक्ष परिक्षा यांचे गुणपत्रक व प्रमाणपत्र यांच्या साक्षांकित प्रती

९. अंगणवाडी सेविका/मदतनीस /मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी २ वर्षांचा अनुभव असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे अुनभव प्रमाणपत्र साक्षांकित प्रत.